# विश्वासाने व नम्रपणे देवाच्या लोकांचे नेतृत्व करा

नम्र पुढारी गिदोनाने देवाच्या सामर्थ्यावर भरंवसा ठेवला

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, गिदोनाप्रमाणे तुझ्यावर भरंवसा ठेवण्यासाठी आमच्या मुलांचे साहाय्य कर. त्याचे सैनिक घडयांमध्ये दिवे घेऊन गेले होते.''

मुलांच्या गरजा व त्यांची समजबुद्धी ह्यांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

मोठया मुलाने वा शिक्षकांनी **शास्ते 7** मधून गिदोनाचा वृत्तांत वाचून दाखवावा किंवा सांगावा.

- मिद्यानी लोकांनी इस्राएलवर हल्ला केला आणि सर्व चीजवस्तू लूटून नेली हे स्पष्ट करुन सांगा.
- देवाचे लोक मूर्तीची उपासना करु लागले म्हणून त्याने मिद्यांनी लोकांकडून त्यांना शिक्षा देवविली.
- ह्या कथावृत्तांतात देवावर भरंवसा ठेवल्यामुळे एक मनुष्य देवाच्या लोकांना विजयाकडे कसा नेतो ते सांगितले आहे.

कथा वृत्तांत्त सांगून झाल्यावर शास्ते 7 वर पुढील **प्रश्न** विचारा

घाबरलेल्या लोकांना घरी पाठव असे देवाने गिदोनाला का सांगितले? (पाहा वचन 2)

- युद्धावर कोणाकोणाला घेऊन जायचे हे देवाने गिदोनाला कसे दाखवले? (पाहा वचन 7. उत्तम सैनिक डोके न वाकवता पाणी प्याले. ओंजळीने पाणी पिताना ते सावधपणे आजूबाजूला पाहात होते).



- शत्रू पक्ष युद्धात हारणार असे दाखवणारे कोणते स्वप्न त्यांच्या शत्रूंना पडले? (पाहा वचने 13-15)
- इस्राएली सैनिक आपल्याबरोबर काय काय घेऊन गेले? (पाहा वचन 16)
- शत्रूच्या सैन्याचा पराभव करण्यासाठी देवाने 300 सैनिकांचा कसा उपयोग करुन घेतला? *(पाहा वचन 20. त्यांनी दिवे असलेले मातीचे घडे फोडले आणि रणशिंग फुंकले. अचानक दिसलेले दिवे आणि आवाज यामुळे शत्रूपक्ष गोंधळून गेला आणि अंधारात ते एकमेकांशी लढू लागले).*

गिदोनाचा विजय ह्या वृत्तांत्ताचे **नाट्यिकरण करा.**

- ही नाटिका सादर करण्यासाठी उपासनेच्या पुढायांशीचर्चा करुन व्यवस्था करा.
- मुलांकडून अभ्यासाच्या वेळी तयारी करुन घ्या.
- मोठया मुलांनी लहान मुलांकडून तयारी करुन घ्यावी.
- **मोठया मुलांनी किंवा** प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात.

**निवेदक :** वृत्तांत्ताचा सारांश करुन मुलांना संवाद पाठ करण्यास मदत करतो.

**देवाची वाणी**

**गिदोन.** हातात रणशिंग, घडा व दिवा ह्यासारख्या वस्तू किंवा त्यांची चित्रे ठेवा.

**मिद्यानी सैन्य**

- **लहान मुलांनी** पुढील भूमिका कराव्यात

**घाबरलेले सैनिक**

**निष्काळजी सैनिक.** हातात भांडे ठेवा.

**सावध सैनिक**

**शत्रूपक्षाचे सैनिक.** हातात तरवारी घ्या.

**निवेदक :** शास्ते 7:1-8 मधून कथा वृत्तांत्ताचा पहिला भाग सांगून मग म्हणा, ''देव गिदोनाला काय सांगतो ते ऐका.''

**देवाची वाणी :** ''गिदोन, तुझ्याकडे पुष्कळ सैन्य आहे. आम्ही आमच्याच बळाच्या जोरावर विजय मिळवला असे त्यांना वाटेल. त्यांना सांग, 'तुम्हांला भीती वाटत असेल तर घरी परत जा.' उरलेले सैनिक कसे पाणी पितात ते पाहा. सावध असणाृया सैनिकांचीच फक्त निवड करा.''

**गिदोन :** ''तुमच्यापैकी ज्यांना भीती वाटते त्यांनी घरी जावे. बाकीच्यांनी ह्या पाणवठयावर येऊन पाणी प्या''

**घाबरलेला सैनिक :** भीतीने थरथर कांपत म्हणा ''भला भीती वाटते, मी आपला घरी जातो'' (निघून जा)

**निष्काळजी सैनिक :** जमीनीवर भांडे ठेवा, खाली वाकून पाणी जिभेने पिण्याचा अभिनय करा. मग मोठयाने म्हणा, ''कुत्र्यासारखे वाकून जिभेने पाणी पितांना मी इकडे-तिकडे पाहाण्यास विसरलो की!'' (भांडे तसेच टाकून पळून जा).

**सावध सैनिक :** पाण्याचे भांडे हाताने उचलून तोंडापाशी आणा. मोठयाने म्हणा, ''पाणी पितांनाही मी सावध आहे. फक्त 300 सैनिकच उरले, पण काही हरकत नाही देव आम्हांला विजय मिळवून देईन.''

**निवेदक :** शास्ते 7:9-19 मधून कथा वृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''देव गिदोनाला काय सांगतो ते ऐका.''

**देवाची वाणी :** ''शत्रूच्या छावणीजवळ जाऊन ते काय बोलतात ते ऐका.''

**गिदोन :** हळूच मिद्यानी सैनिकाच्या मागे जाऊन ऐका.

**मिद्यानी सैनिक :** ''मला स्वप्न पडले होते, एक लहानशी भाकरी घरंगळत येऊन माझ्या तंबूत पडली आणि तंबू खाली पडला. याचा अर्थ हे युद्ध आपण हारणार!''

**गिदोन :** तुमच्या सैन्याकडे परत जाऊन म्हणा. ''इस्राएलाच्या सैनिकांनो. हे युद्ध जिंकण्यासाठी देव आपल्याला मदत करणार असल्याचे त्याने दाखवले आहे. ही रणशिंगे आणि दिवे असलेले घडे आहेत. आपण त्यांच्या छावणीपाशी पोचताच रणशिंगे वाजवा आणि घडे फोडा.''

**निवेदक :** वृत्तांत्ताचा तिसरा भाग सांगा (वचने 20-22). आणि मग म्हणा, ''गिदोन काय म्हणतो ते ऐका''

**गिदोन :** मोठयाने म्हणा, ''आत्ता!''

**सावध सैनिक :** रणशिंगे वाजवा, घडे फोडून दिवे वर धरा. मग मोठयाने म्हणा, ''गिदोनाची तरवार आणि परमेश्वराची तरवार!''


**शत्रूपक्षाचे सैन्य :** गोंधळ उडाल्याने इकडे-तिकडे पळा आणि आपसात लढाई करा. मग म्हणा, ''फारच अंधार आहे, काही दिसत नाही!'' ''हा आवाज कसला आहे?'' ''ते दिवे बघ! सगळीकडे दिवेच दिवे!'' ''शत्रू आपल्या छावणीत शिरला आहे!'' ''पळ, पळ!'' (पळून जा)

**निवेदक :** वा मोठे मूल नाटिका संपल्याचे सांगून मदत करणाृयांचे आभार माना.

**प्रश्न विचारा :** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांना वरील प्रश्न मुलांनी विचारावेत.

**चर्चा करा :** आम्ही देवावर भरंवसा ठेवला तर आम्ही दुर्बल असलो तरी देव आमचा उपयोग कसा करुन घेतो, याची आणखी इतर उदाहरणे सांगा. (मोठया माणसांनी किंवा मुलांनी उदाहरणे द्यावीत).

आतमध्ये दिवा असलेल्या घडयाचे चित्र काढून मुलांना तसे काढायला सांगा.



- मुलांनी त्यांचे चित्र मोठया माणसांना किंवा आपल्या आई-वडीलांना दाखवावे.

- यावरुन, आपण देवावर भरंवसा ठेवला तर तो दुबळया लोकांचाही उपयोग करतो, याची आठवण होते हे मुलांनी स्पष्ट करावे.
- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

**कविता :** 2 किंवा अधिक मुलांनी स्तोत्र 23 मधील वचने म्हणून दाखवावीत.

**पाठ करा** मार्क 9:35.

मोठया मुलांनी गिदोनोसारख्या विश्वासाने नेतृत्व करणे या विषयावर कविता, गीते किंवा नाटिका लिहावी. हे काम ते आठवडयामध्ये करतील.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, तू सर्वसमर्थ आहेस. तू नेहमीच शत्रूवर विजय मिळवतो. आम्ही अशक्त दुबळे आहोत, पण काहीही झाले तरी आमचा तुझ्या सामर्थ्यावर भरंवसा आहे. आम्ही ख्रिस्ताच्या द्वारे विजयी होऊ.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net